# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/०६/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत अर्धा कि.मी. अंतरावरील भानेगांव रेल्वे पुलाजवळ येथे दिनांक ०६/०६/२०२२ चे १८.१८ वा. सुमारास ग्राम पंचायत भानेगाव येथील पाणी पुरवठा फिल्टर प्लँट चे भानेगांव रेल्वे पुलाजवळ लावलेले पाईप त्यापैकी सहा बीडचे पाईप २० फुटाचे २०० ऐम ऐम चे किंमती ३७,०००/—रु. चे व एक बिडचा वॉल किंमती ७,०००/—रु. असा एकुण कि. ४३,०००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी दिपक रेवतकर मो.क्र. ९७३०१०३०७८ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मांगली चांदे येथे दिनांक ०७/०६/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रभु मन्साराम नाकतोडे, वय ६० वर्ष, रा. चिखलगाव जि. चंद्रपुर हे आरोपी नामे— किसन दवळे, रा. चांदेमांगली याच्या शेतात नोकर म्हणुन काम करीत असुन फिर्यादी हे शेतातील घरात होते. तेव्हा आरोपी याने 'तु कामावर का जात नाही' असे म्हणुन ढकलले तेव्हा फिर्यादी हे खाली पडल्याने फिर्यादीच्या डाव्या डोळयाजवळ जखम होवुन जास्त प्रमानात रक्त निघाले तसेच आरोपीने त्यास धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

### फसवणुक

**१) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ७ कि.मी अंतरावरील मौजा तुमान येथे दिनांक १७/०५/२०२२ ते दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत फिर्यादी नामे— जिवन लेनाजी टाले वय ३५ वर्ष रा. तुमाण ता. मौदा जि. नागपुर यांनी कृर्षी केंद्र सुरु करण्याकरीता आरोपी नामे— अभिषेक शर्मा रा. दिल्ली याने फोन करुन 'आम्ही तुम्हाला कृर्षी केंद्र सुरु करण्याकरीता कंपनी द्वारे फायनान्स बनवुन कृर्षी केंद्राचे माला पाठवितो असे म्हणुन फिर्यादीस वेळोवेळी कंपनीचे अकाऊंट वरती पैसे टाक' असे म्हटले. यावरुन फिर्यादी यांनी वेळोवेळी अकाऊंटला फोन ॲप व बॅक द्वारे एकुण ७,३५,६१२/— रुपये टाकले परंतु आरोपी याने कोणतेही कृर्षी केंद्राचे माल पाठविले नाही. फिर्यादीचे लक्षात आल्याने फिर्यादीने सायबर सेल ना.ग्र येथे तक्रार दिली तक्रार पो स्टे. अरोली ला मेल द्वारे प्राप्त झाल्याने व फिर्यादी स्वता पो.स्टे ला आल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ सी, डी माहिती तंत्रज्ञान कायद्ययान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री जोशी मो.न ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील मौजा पंचवटी काटोल येथे दिनांक ०३/०६/२०२२ चे १९.५२ वा. ते दिनांक ०५/०६/२०२२ चे १०.१७ वा. पर्यंत फिर्यादी नामे– कोमल मिलिंद सरदार वय ३६ वर्ष, रा. पंचवटी काटोल याने आपले फेसबुक अकाउन्ट वरून भाजीपाल्याचा व्यवहार आरोपी नामे– मोहम्मद अमिर सुहेल रा. बंगलोर याच्या सोबत कि. ४,४७,०००/–रूपयाच्या मिर्ची खरेदीचा व्यवहार केला असुन त्याच्या मागणी प्रमाणे दिनांक ०३/०६/२०२२ ते ०५/०६/२०२२ चे दरम्यान २,३०,०००/– रूपये फिर्यादीने आरोपीचे पर्सनल अकाउन्ट वर पाठवुन मिर्ची ची मागणी केली असता हिरवी मिरची ची गाडी पाठवली नाही. अशाप्रकारे आरोपीने फिर्यादीकडुन २,३०,०००/–रू. घेवुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४०६ भादंवि. सहकलम ६६ डी माहिती तंत्रज्ञान कायद्ययान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री महादेव आचरेकर मो.न ८३८००७२२११ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. जलालखेडा :–** अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा रामपुरी शिवार कळ नदीचे पात्रामध्ये सुमारास **परमेश्वर रामचंन्द्र धुर्वे (मृतक) वय ४८ वर्ष रा. रामपुरी त.नरखेडा जि. नागपुर** हा नेहमी दारुपिण्याच्या सवईचा असुन दि.०७/०६/२२ रोजी १२/०० वा. सुमारास तो नेहमी प्रमाणे करंट लावुन मच्छी पकडणे कामी कळ नदीचे पात्रामध्ये दारुचे नशेमध्ये करंट लावण्याचे साहित्य घेवुन गेला असता त्याने कळ नदीचे पत्रामध्ये बांबुच्या लाकडी दांड्याला तारेची जाळीला विद्र्युत करंट लावुन मच्छी पकडत असता त्याचा अचानक पाय नदीच्या पात्रात घसरुन तोल गेल्याने पडला. परमेश्वर धुर्वे यास विद्ययुत करंट लागुन पाण्यात पडल्याने पाण्यात बुडुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. अनिता दिलीपराव श्रीरामे, वय ४६ वर्ष, रा. रामपुरी, त. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रोजोक तायडे मो.क्र. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बोरी :–** अंतर्गत आंजणगांव जवळील तलाव शिवार दि. ०६.०६.२०२२ चे १४.०० वा. सुमारास **अंजुबाई सुरेश भलावी (मृतक), वय ५५ वर्ष रा.धोकडी ता.जि नागपुर** हिने तोंडाचा कॅसर ला कंटाळुन तलावात उडी घेउन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवेन्द्र केशव मुरले, वय ४२ वर्ष रा. आंजणगांव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे मो क्रं ८६६८८१६०४९हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १० कि.मी अंतरावरील धापेवाडा येथे दिनांक ०७/०६/२०२२ चे ०५:३० वा. दरम्यान **मनोज नागोरावजी ढेंगे (मृतक), वय ४० वर्ष रा. धापेवाडा** याने आपल्या स्वताचे राहते घरी छताला लोखंडी कडीला दोरीने बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रावण विठोबाजी मोहड वय ४५ वर्ष रा.वार्ड क्र ३ तेलकामठी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहसयक फौजदार तिवारी मो. नं ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे सुमारास **सुमीत राजकुमार चौरे (मृतक) वय ३२ वर्ष रा.पिपरी चुन्नी रिधोरा** हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन नेहमी दारू पित होता. दि. ०६/०६/२०२२ रोजी १७.०० वा पुर्वी विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे सुमीत चौरे हा मृत अवस्थेत मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश दिलीप मेश्राम वय २२ वर्ष रा. श्याम नगर पारडी, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ प्रमोद बंसोड मो.नं. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

## जातीविषयक शिवीगाळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा**:– अंतर्गत १५ कि. मी अंतरावरील मौजा कुंभापूर शिवार येथे दिनांक ०६/०६/२०२२ चे ११:०० वा. दरम्यान फिर्यादी महिला वय ५० वर्षीय हीचे पतीची वडीलोपार्जित पाच एकर शेती मौजा कुंभापूर शिवारात असुन त्या शेतीच्या धुऱ्याला लागुन आरोपी नाम– धनराज डांगरे, रा. वैशाली नगर नागपूर याची शेती आहे. फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये शेतात जाणे येणाच्या रस्त्यामुळे एसडीएम मौदा येथे केस सुरू आहे. फिर्यादी ही आपल्या शेतावर पपई च्या पिकाला पाणी देत असता आरोपी हा फिर्यादीचे शेतात नाली करीत असता 'तुम्ही आपले शेतात नाली करा ही जागा आमची आहे' असे फिर्यादीने म्हटले असता आरोपीने फिर्यादीस जाती वाचक शिवीगाळ करून अपमान केला.तसेच आरोपीने फिर्यादीला ढकल–ढुकल केले व फिर्यादीला पट्टी बांधलेल्या ठिकाणी काठीने मारले व 'तु तुझ्या मुलाला बोलाव मी त्याला इथेच मारीन' असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भा.द.वि. सहकलम ३(१) आर, ३(२)व्हीए अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. अन्वये

गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. मुख्तार बागवान उपविभागीय पोलिस अधिकारी कामठी विभाग मो.क्र. ९०८२५०७०७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**